प्रकरण दुसरे

लोकसाहित्य: संकल्पना व स्वरूप

२. १. प्रस्तावना

२. २. लोकसाहित्य: संज्ञा व अर्थ

२. ३. लोकसाहित्यातील 'लोक' पदाचा विग्रह व अर्थ

२. ४. लोकसाहित्यातील 'साहित्य' पदाचा विग्रह व अर्थ

२. ५. वैश्विक पातळीवरचा लोकसाहित्य विचार

२. ६. भारतीय लोकसाहित्य विचार

२. ७. महाराष्ट्रीय लोकसाहित्य विचार

२. ८. लोकसाहित्य व लोकसंस्कृती: एक अनुबंध

२. ९. लोकसाहित्याचे प्रयोजन

२. १०. लोकसाहित्य आणि ललित साहित्यातील साम्यभेद

२. ११. समारोप

संदर्भ

प्रकरण दुसरे

लोकसाहित्य : संकल्पना व स्वरूप

२.१. प्रस्तावना:

लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात भाषाभ्यासकांनी केली असली तरी नंतरच्या काळात त्याचे अनेकानेक अंगाने अभ्यास होऊन आज लोकसाहित्याला विशिष्ट असे स्थान प्राप्त झाले आहे. अनेक शास्त्रांना लोकसाहित्य उपयोगी पडत असल्याने त्या त्या काळात आणि त्या त्या शास्त्रकाराने लोकसाहित्याचा उपयोग करून घेतल्याचे दिसते. यातून लोकसाहित्याची व्याप्ती वाढण्यास मोठी मदत झाली असून त्याचे महत्त्वही जगाला मान्य झाले आहे. एकेकाळी लोकसाहित्य हे अशिक्षितांचे, गावंढळांचे, मागासलेल्यांचेच समजले जाई. परंतु काही दशकांपासून ही तुच्छतेची दृष्टी दूर व्हायला लागली आहे. यासाठी सर्वात आधी लोकसाहित्याचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य पाश्चात्यांनी केले. अगदी भारतातही शास्त्रशुद्ध पद्धतीने लोकसाहित्याचे संकलन आणि संशोधनाची सुरुवात पाश्चात्यांनीच केली. पाश्चात्यांकडून प्रेरणा घेऊन भारतीयांनी, पर्यायाने महाराष्ट्रीयांनी लोकसाहित्याच्या अभ्यासास सुरुवात केली. त्याचे महत्त्व समाजाला पटवून दिले. याचा परिणाम म्हणून आज जवळजवळ महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांतून पदव्युत्तर पातळीवर लोकसाहित्याचा अभ्यासक्रम निश्चित केला आहे. म्हणजे आज महाराष्ट्राला सर्वतोपरीने लोकसाहित्याचे महत्त्व पटले आहे असे आपणास म्हणता येते. याच दृष्टीकोनातून प्रस्तुत प्रकरणात लोकसाहित्याच्या विविध अंगांचा विचार करावयाचा आहे.

२. २. लोकसाहित्य:संज्ञा व अर्थ:

मराठी 'लोकसाहित्य' हा पर्यायवाची शब्द इंग्रजीतील Folkloreसाठी वापरला जातो. 'लोकसाहित्य' हा सामासिक शब्द 'लोक' आणि 'साहित्य' या दोन पदांच्या संयोगाने बनलेला आहे. त्यातील 'लोक' हे पद Folk साठी तर 'साहित्य' हे पद lore साठी वापरले जाते. २२ ऑगस्ट१८४६ रोजी The Athenaeumया नियतकालिकाच्या संपादकांना AmbroseMerton या टोपणनावाने विलियम थॉम्स (William Thom's) यांनी एक पत्र लिहिले. या पत्रात त्यानी 'लौकिक पुरातत्त्व'(Popular Antiquities) आणि 'लौकिक वाङ्मय'(popular Literature) यासाठी Folklore हा शब्द वापरावा असे सुचविले. तेव्हापासून हा शब्द वापरण्यात येतो. हा शब्द सर्वप्रथम वापरण्याचा मान विलियम थॉम्स यांना जातो.[१]

भारतात अनेक साहित्यप्रवाह पश्चिमेकडून आयात झाले आहेत. त्यातीलच एक म्हणजे लोकसाहित्याचा अभ्यासप्रवाह होय. याचा अर्थ असा नव्हे की,इंग्रजपूर्व 'लोकसाहित्य'हा अभ्यासप्रवाह भारताला अपरिचित होता. तो पूर्वीपासूनच भारतात अस्तित्त्वात होता. किंबहूना भारत

हा 'लोकसाहित्यदृष्ट्या अतिशय संपन्न असा देश आहे. हे थिओडोर बेनफे यांच्या 'भारतमुलक सिद्धांत' यावरूनही स्पष्ट होते. मात्र लोकसाहित्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाची सुरुवात विसाव्या शतकारंभी भारतात झाली असे म्हणता येते.

महाराष्ट्रात सर्वप्रथम लोकसाहित्याचा पाया घालण्याचे काम कै.वि.का. राजवाडे यांनी केले असे आपणास म्हणावे लागते. त्यांनी १९२० साली 'लोकगीत' हा पारिभाषिक शब्द वापरला आणि 'सज्जनगडावरचे एक लोकगीत' या लेखात लोकगीतांची लक्षणे विषद करण्याचा प्रयत्न केला.'लोककथा' हा पारिभाषिक शब्दही राजवाडे यांनीच सर्वप्रथम वापरला. त्यांनी १९२५ साली 'सूर्यनारायणाची कहाणी व सूर्यव्रत' या लेखात 'लोककथा' हा शब्द वापरून 'कहाणी हे लोककथांचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे' असे म्हटले आहे.[२]कै. वि. का. राजवाडे यांनी लोकगीत आणि लोककथा हे शब्द वापरले असले तरी ते समाजमनावर बिंबविण्याचे, लोकप्रचलित करण्याचे, समाजात रूढ करण्याचे काम मात्र कै. ना. गो. चापेकर आणि कै. शं. गो. दाते यांनी केले असे म्हणावे लागते.

Folklore या शब्दाचा समर्पक आशय व्यक्त करण्यासाठी कै. दत्तो वामन पोतदार यांनी 'लोकविद्या' हा शब्द सुचविला. याला समर्थक म्हणून डॉ. रा. चिं. ढेरेंसारखे काही अभ्यासक लाभले[३] तरी तो शब्द रूढ होऊ शकला नाही. रूढ न होण्याचे सार्थक उत्तर देऊन 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथामध्ये दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्य' ही संज्ञा प्रथम वापरली आणि तेव्हापासून ती मराठीमध्ये रूढ झाली आहे.

२. ३. लोकसाहित्यातील 'लोक' पदाचा विग्रह व अर्थ:

Folklore या इंग्रजी शब्दाची व्याप्ती आणि त्यात समाविष्ट होणाऱ्या अनेक घटकांचा सविस्तर परिचय करून देण्यासाठी पाश्चिमात्य अभ्यासकांनी 'Dictionary of Folklore, Mythology and Legends' या नावाचा एक बृहत्कोशही इंग्रजीमध्ये तयार केला आहे. याव्यतिरिक्त Encyclopedia of Columbia, Encyclopedia of Britannica आणि Encyclopedia of Social Sciences तयार केले आहेत. असे असले तरी लोकसाहित्याची परिपूर्ण, सर्व गुण संपन्न, सर्व समावेशक अशी एकच एक व्याख्या आजतागायत कोणाला करणे शक्य झाले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे 'लोकसाहित्य' या शब्दाची अतिव्यापकता हे आहे. थोडक्यात जीवनोपयोगी सर्व सामाजिक घटकांचा अभ्यास या विषयामध्ये मोडतो असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

'लोकसाहित्य' या सामासिक शब्दाचा विग्रह करता त्याचे 'लोक' आणि 'साहित्य' असे करता येते. Folklore शब्दातील Folk साठी 'लोक' तर lore साठी 'साहित्य' ही पदे वापरण्यात येतात. लोकसाहित्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी आपल्याला लोक आणि साहित्य या संज्ञांचे अर्थ समजून घेणे अत्यावश्यक आहे. यातील 'लोक' हा शब्दही सामान्य लोकापेक्षा वेगळा ठरतो तो यासाठीच. Folklore या इंग्रजी शब्दाची जी व्यापकता आहे, जो आशय आहे. तो मराठीतील 'लोकसाहित्य' या शब्दाला अपेक्षित आहे. यासाठी अनेकानेक अभ्यासकांनी आपापल्या परिने त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

तारा भवाळकर यांनी 'लोक' या शब्दाबद्दलचे समाजातील अनेक गैरसमज दूर करून असे म्हटले आहे की, "जो समूह माणसाच्या आदिम अस्तित्वापासूनच्या संस्कृतीचे जतन परंपरेने करतो तो सर्व 'लोक'मध्ये सामावला जातो."[४] डॉ. प्रभाकर मांडे यांनी त्यांच्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात 'लोक' या पदाबद्दल अनेक तज्ज्ञांची मते व्यक्त करून असे म्हटले आहे की,'लोक' म्हणजे अशा व्यक्तींचा समूह, ज्यातील व्यक्तींमध्ये किमान एखादे समान तत्त्व असून त्याच्या काही निराळ्या मौखिक परंपरा असतात. त्यामुळेच त्या समूहाला त्याचे निराळे अस्तित्व असते. या निराळ्या अस्तित्वाचे व त्याचे कारण असलेल्या पारंपरिक बाबींसंबंधीचे भान त्या समूहातील व्यक्तींना असते. हा पारंपरिक जीवन जगणाऱ्या व्यक्तींचा समूह असतो.[५]डॉ. शिंदेही अनेक तज्ज्ञांची मते लक्षात घेऊन 'लोक' या पदाचा अर्थ सुचवितात. ते म्हणतात, आतापर्यंतच्या अभ्यासकांची मते आणि शब्दकोशातील अर्थ ध्यानात घेता एका विशिष्ट भूप्रदेशातील सामाजिक आणि सांस्कृतिक एकत्व असणाऱ्या मानवसमूहाला लोक असे म्हणता येईल.[६] तर सिद्धांत कौमुदीत 'लोक' हा शब्द संस्कृतातील लोकृ दर्शन या धातूपासून आल्याचे सांगितले जाते. या धातूचा अर्थ 'पाहणे' असा होतो. म्हणजेच जो पाहणारा जनसमुदाय आहे, त्याला आपण लोक म्हणू शकतो. भारतात आर्यांचे आगमन झाल्यानंतर प्रारंभी आर्यांचा आर्येतरांशी झालेला संघर्ष आणि त्यातून निर्माण झालेल्या दोन भिन्न संस्कृती. त्यातील एक वेद मानणारी तर दुसरी वेद न मानणारी. म्हणजेच आर्ये वेदाला प्रमाण मानणारे तर अनार्ये वेदाला न मानणारे. यातील वेद न मानणाऱ्या अनार्यांना लोक/जन असे म्हटले जाऊ लागले. असे असले तरी उपरोक्त विधानासंदर्भात अभ्यासकांत एकमत नाही.

२. ४. लोकसाहित्यातील 'साहित्य' पदाचा विग्रह व अर्थ:

लोकसाहित्यातील 'लोक' या पदाचा अर्थ समजून घेतल्यानंतर आता 'साहित्य' या पदाचा अर्थ समजून घेणे अत्यावश्यक आहे. मुळात साहित्य या पदाऐवजी काही अभ्यासक वाङ्मय, विद्या, वार्ता, संस्कृती असे अनेक शब्द वापरताना दिसतात. उदा. लोकवाङ्मय, लोकविद्या, लोकवार्ता, लोकसंस्कृती इत्यादी. यातील पहिले पद समान असून दुसरे पद मात्र वेगळे आहे. नुसते वेगळेच नाही तर त्यातून प्रतीत होणारे अर्थही वेगळे आहेत. प्रत्येक शब्दाचा आग्रह धरणारे अभ्यासकही वेगवेगळ्या विचारसरणीचे आहेत. या सगळ्यांना बगल देऊन आज 'लोकसाहित्य' हा शब्द मराठीमध्ये रूढ झालेला आहे. याच कारणाने लोकसाहित्यातील 'साहित्य' या पदाचा अर्थ समजून घेणे रोचक ठरेल.

प्रभाकर मांडे यांनी 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात साहित्य हा शब्द सामुग्री या अर्थी वापरलेला आहे. ते म्हणतात, "साहित्य म्हणजे सामुग्री. स्वयंपाकाचे साहित्य, सुताराचे साहित्य, मुंजीचे साहित्य इत्यादी ठिकाणी याच व्यापक अर्थाने आपण हा शब्द वापरतो."[७]त्यांनी इंग्रजीतील Lore या पदासाठी 'साहित्य' हे पद जसेच्या तसे वापरले आहे.

दुर्गा भागवतांनी'लोकसाहित्याची रूपरेखा' याग्रंथात Folklore साठी लोकसाहित्य हा शब्द प्रथम वापरला. हाच शब्द आज मराठीत सर्वमान्य झाला आहे. दुर्गा भागवतांनी हा शब्द ज्या अर्थी वापरला तो अर्थच मुळी प्रभाकर मांडे यांनी लक्षात घेतला नाही; अशी टीका डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी आपल्या 'लोकसाहित्यमीमांसा- भाग १, २' मध्ये केली असून ते पुढे म्हणतात, दुर्गा भागवत

यांनी लोकसाहित्य हा शब्द अतिशय जाणीवपूर्वक वापरला आहे. संस्कृत साहित्य शास्त्रात 'साहित्य' हा शब्द कथा, कविता, नाटक, कादंबरी इत्यादी सर्जनपर सामग्रीसाठी वापरलेला आहे. तोच अर्थ लोकसाहित्यामध्ये वापरणे आवश्यक आहे. लोकसाहित्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या साहित्य या शब्दाचा अर्थ लोकसाहित्यातील सर्जनपर साहित्य असाच घ्यावा लागेल. म्हणजे लोककथा, लोकगीते, लोकनाट्य, म्हणी, वाक्प्रचार, कुटकोडी, मंत्र ही सर्व शाब्दसामुग्री लोकसाहित्यातील साहित्य या शब्दामध्ये अंतर्भूत होते. आणि त्याच अर्थाने लोकसाहित्यामध्ये साहित्य शब्द वापरणे आवश्यक आहे.[८]

२. ५. वैश्विक पातळीवरचा लोकसाहित्य विचार:

वैश्विक पातळीवर लोकसाहित्याचा विचार सतराव्या शतकापासून सुरु झालेला दिसतो. आज युरोप-अमेरिकेसारख्या अनेक प्रगत देशांत विद्यापीठ पातळीवर किंवा उच्च शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था पातळीवर लोकसाहित्याचा अभ्यास होताना दिसतो. मानव समूहातील अनेक सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा उलगडा करण्यासाठी अभ्यासकांनी लोकसाहित्याची कास धरली. तेव्हापासून लोकसाहित्याच्या विविध अंगोपांगांचा विचार करून लोकसाहित्याची व्याख्या करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. तर काही अभ्यासकांनी विविध लक्षणे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. काहींनी लोकसाहित्यात समावेश होणाऱ्या विविध घटकांची यादी देण्याचा प्रयत्न केला. तरीही सर्वबाजूंनी लोकसाहित्याला आपल्या कवेत घेईल अशी लोकसाहित्याची व्याख्या अजून झालेली नाही. यादृष्टीने वैश्विक पातळीवर झालेला लोकसाहित्याचा विचार पाहणे आवश्यक आहे.

मुळात लोकसाहित्याचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करण्याची सुरुवात पाश्चात्य देशात झाली. सन १८४६ साली विलियम जॉन थॉम्स याने Folklore हा शब्द वापरण्यापूर्वीही लोकसाहित्याचा अभ्यास Popular Antiquities म्हणून होत होताच. Folklore हा शब्द प्रचलीत झाला असला तरी तो अनेक अभ्यासकांनी वेगवेगळ्या दृष्टीकोनातून वापरलेला आहे असे दिसते. भाषाशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र अशा अनेक सामाजिक शास्त्रांना लोकसाहित्य हा विषय जवळचा वाटला. किंबहुना लोकसाहित्याच्या अभ्यासाशिवाय या सामाजिक शास्त्रांचा परिपूर्ण अभ्यास होऊ शकणार नाही याची तीव्र जाणीव झाल्याने पाश्चिमात्य देशांत अनेक संप्रदाय उदयाला आले. त्या त्या संप्रदायांनी लोकसाहित्याच्या विकासाला हातभार लावलेला आहे.

सर्वप्रथम लोकसाहित्यासंबंधी सैद्धांतिक स्वरूपाचे लेखन हे भाषाशास्त्र व दैवतकथाशास्त्राचे अभ्यासक यांनी केले. त्यामध्ये जेकब लुडविग ग्रिम, कार्ल विलियम ग्रिम आणि मॅक्समुलर यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागतो. त्यांच्याशिवाय वॉल्टर केली, जॉन डब्ल्यू कॉक्स, रॉबर्ट ब्राऊन, अॅब्राम स्माईथ पामर यांनीदेखील या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. त्यानंतर मानववंशशास्त्रज्ञांनी या विषयाचा शास्त्रीय विचार सुरु करून लोकसाहित्याचे स्वरूप कोणते? त्याची लक्षणे कोणती? त्याची उत्पत्ती कुठे होते? त्याचा प्रसार कशा प्रकारे होतो? इत्यादी प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. यामध्ये एडवर्ड बी. टायलर (प्रिमिटिव्ह कल्चर), सर जेम्स फ्रेझर (द गोल्डन बाऊ) या मानववंशशास्त्रज्ञांचा समावेश होतो.[९]

ऐतिहासिक-भौगोलिक दृष्टीकोनातून लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्यांमध्ये थिओडोर बेनफे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्याने जर्मन भाषेत पंचतंत्राचे भाषांतर करून त्या ग्रंथाला एक विस्तृत प्रस्तावना लिहिली आणि त्यात त्याने असे प्रतिपादन केले की, जगभर पसरलेल्या लोककथांचे जन्मस्थान भारत हेच आहे. त्यास भारतमूलक सिद्धांत (Indianist Theory) असे म्हणतात. हा बेनफेचा विचार पुढे विवादास्पद ठरला असला तरी तो भारतीयांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. याच ऐतिहासिक-भौगोलिक दृष्टीकोनातून पुढे क्रोनने अभ्यास केल्याचे दिसते.

मानसशास्त्रीय दृष्टीकोन समोर ठेऊन लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्यांमध्ये आर. आर. मेटर, विल्हेम वुंट, सिग्मंड फ्राईड, कार्ल गुस्ताव इत्यादींचा समावेश होतो. मेटर याने 'सायकॉलॉजी अँड फोकलोर' हा ग्रंथ लिहून मानसशास्त्र आणि लोकसाहित्य यांच्यातील परस्परसंबंध विशद करण्याचा प्रयत्न केला. वुंटने 'फोक सायकॉलॉजी'मध्ये महत्त्वाची भूमिका घेऊन लोकसाहित्याची व्युत्पत्ती मानवी बुद्धीभ्रमातून झाली असा विचार मांडला. फ्राईडने इडीपसच्या कथेतून माता व पुत्र यांच्या लैंगिक आकर्षणाचा, इडीपस गंडाचा सिद्धांत मांडला. त्याचीच दुसरी बाजू म्हणजे बाप व मुलगी यांच्या लैंगिक आकर्षणाची कथा इलेक्ट्राची होती. तिच्यावरून इलेक्ट्रा कॉप्लेक्सचा उपसिद्धांतही निघाला. राष्ट्राराष्ट्रांतल्या जुन्या-नव्या कथांची तपासणी झाली आणि हे दोन सिद्धांत शास्त्रज्ञांत मान्यता पावले.[१०]

याशिवाय अनेक लोकसाहित्याशी निगडीत संप्रदाय उदयाला आले. याचे विवेचन दुर्गा भागवतांनी त्यांच्या लोकसाहित्याची रूपरेखा या ग्रंथात केले आहे. त्यात सांगायचेच तर निसर्गरुपकवादी संप्रदाय, भ्रांतकल्पनावादी संप्रदाय, स्पष्टीकरणवादी संप्रदाय, उत्तरजीवित्ववादी संप्रदाय, वितरणवादी संप्रदाय, विसरणवादी संप्रदाय, कार्यान्वयी संप्रदाय इत्यादी संप्रदायांचा उल्लेख करता येईल. यातील काही संप्रदाय स्वतंत्र विचारसरणीचे असून काही संप्रदाय एकमेकांत विलीन झालेले आहेत.

२. ६. भारतीय लोकसाहित्य विचार:

भारतीय लोकसाहित्याचा विचार करता त्याची बीजे आपल्याला अतिप्राचीन काळातील वेद, उपनिषदे, पुराण, ब्राह्मणग्रंथ, रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांत सापडते. सुक्त व गाथा यासारखे शब्द संहितांत सापडतात. तर ब्राह्मणग्रंथांत आख्यान, पुराण, इतिहास, अर्थवाद असे अनेक लोकसाहित्याशी संबंधीत शब्द आढळतात. आख्यायिका हा शब्द प्रारंभीच्या वैदिक वाङ्मयात सापडत नाही. उत्तरकालातल्या-तैत्तिरीय-आरण्यकात एकदाच तो येतो. मात्र महाभारतापासून हा शब्द 'कथा' या अर्थी रुळलेला दिसतो. अन्वख्यान हा शब्द शतपथ-ब्राह्मणात तीन ठिकाणी आलेला असून त्याचा अर्थ आख्यानाला अनुसरणारे किंवा पूरक असे निवेदन किंवा उपकथा. अनुव्याख्यान हा शब्द बृहदारण्यकोपनिषदात आढळतो.[११]

वरील विवेचन करण्याचे कारण हे की, लोकसाहित्याशी निगडीत हे शब्द वेद अथवा वेदोत्तर वाङ्मयातही आढळतात. याचाच अर्थ असा की ज्या अर्थी हे शब्द तत्कालीन वाङ्मयात वापरले जात होते त्या अर्थी त्याकाळीही लोकसाहित्याला किंवा लोकसाहित्यातील काही उपांगांना महत्त्वाचे स्थान होते.

बौद्ध व जैन वाङ्मयाचेही महत्त्व कालमानाच्या दृष्टीने असाधारण असे आहे. गौतमबुद्धाचा मृत्युकाल ख्रिस्तपूर्व ४८० वर्षे हा निश्चित आहे. महावीरही त्याचाच समकालीन. बौद्धांच्या जातकांचे प्रथम व्यवस्थित संस्करण इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकात झाले. या जातकांवर बौद्धपरंपरेचा एक आगळा वेगळा ठसा उमटलेला आहे. जैनांच्या नीतिपर कथांना अवचुर्णी, अवचुर्ण, चुर्णी, चूर्ण, चूर्णक असे नाव आहे. परंतु चूर्णक या शब्दाची समाधानकारक व्युत्पत्ती मिळत नाही. कसेही असले तरी बौद्ध व जैन परंपरेतील वाङ्मयाचे भारतीय लोकसाहित्याच्या दृष्टीकोनातून महत्त्व कमी होत नाही.[१२]

भारतातील लोकसाहित्य संकलनाची परंपरा प्राचीन असली तरी भारतात लोकसाहित्याचा अभ्यास खऱ्या अर्थाने एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, खरे तर विसाव्या शतकाच्या प्रथम पर्वात सुरु झाला. आपल्याकडे जसे सगळेच आधुनिक अभ्यासप्रवाह पश्चिमेकडून आयात झाले, तसा लोकसाहित्याचा अभ्यासप्रवाहही आधुनिक काळात पश्चिमेकडून मोठ्या प्रमाणावर आयात झालेला आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की,'लोकसाहित्य'ही आयात आहे. मुळात लोकसाहित्यदृष्ट्या भारत ही अतिशय संपन्न भूमी आहे. मात्र त्याच्या पद्धतशीर अभ्यासाची कल्पना आणि प्रारंभ मात्र इंग्रजोत्तर काळात विसाव्या शतकारंभी भारतात झाला.[१३]सुरुवातीचे लोकसाहित्याचे संकलन आणि संशोधन केले तेही इंग्रजांनी आणि मिशनऱ्यांनीच. इंग्रज हे मुळात विस्तारवादी साम्राज्यातील लोक असल्याने प्रथम ते जरी व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले असले तरी त्यांचा मूळ हेतू भारतावर राज्य करणे हाच होता. ह्याच हेतुपुर्तीसाठी त्यांनी समग्र भारतीय लोकजीवनाचा, पर्यायाने लोकांच्या रिती-भातींचा, रूढी-परंपरांचा, सण-उत्सवांचा, वेशभूषेचा, कथा-गीतांचा, भाषेचा इत्यादींचा समग्र अभ्यास केला. हेतू कोणताही असला तरी भारतीय लोकजीवनाचा समग्रतेने शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करण्याचा पहिला मान इंग्रजांनाच द्यावा लागतो. दुसरा एक वर्ग मिशनऱ्यांचा. तोही आपल्या धर्म प्रसार प्रचारार्थ भारतीय लोकजीवनाचा अभ्यास करतच होता. मिशनऱ्यांना आणि इंग्रजांना आपापले हेतू साध्य करण्यासाठी भारतीय लोकजीवनाचा आणि लोकभाषेचा अभ्यास करण्याशिवाय गत्यंतर नाही हे माहित होते. म्हणून त्यांनी वैयक्तिक आणि काही प्रमाणात संस्था स्थापन करून संस्था पातळीवर लोकसाहित्याचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. यातून प्रांतोप्रांती इंग्रज शासनाने गॅझिटियर तयार करून घेतले. याचा मोठा फायदा इंग्रजांना तर झालाच पण आता भारतीयांनाही होतो आहे.

इंग्रजांनी आपले साम्राज्य स्थापन करण्याआधीच भारतीय संस्कृती आणि लोकजीवन याविषयी अभ्यास सुरु केला होता याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे इ. स.१७८४ साली विल्यम जॉन्स यांच्या प्रयत्नाने कोलकात्याला स्थापन झालेली 'Asiatic Society of Bengal' या नावाची संस्था. या संस्थेद्वारे लोकसांस्कृतिक दृष्टीने लोकसाहित्याच्या संकलनाच्या कार्याला सुरुवात झाली असे म्हणता येईल.

लोकसाहित्याच्या दृष्टीने प्रारंभ काळात ज्या पाश्चात्य विद्वानांनी महत्त्वपूर्ण कार्य केले त्यापैकी कर्नल जेम्स आणि कर्नल टॉड हे महत्त्वपूर्ण आहेत. कर्नल टॉड हे राजस्थानचे रेसिडेंट असल्याने त्यांनी राजस्थानचा इतिहास, रूढी, परंपरा, वेशभूषा इत्यादींचा शोध घेऊन १९२९ मध्ये 'Annals and Antiquities of Rajasthan' हा ग्रंथ सिद्ध केला. १८६६ साली सर रिचर्ड टेंपल

यांनी पंजाबी लोकसाहित्यविषयक लेखांचा संग्रह प्रसिद्ध केला. मिस् मेरी फ्रियर यांनी 'Old Deccan Days' या नावाचा लोककथांचा संग्रह १८५८ साली प्रसिद्ध केला. चार्लस् गोवर याने दक्षिण भारतातील कानडी, तामिळी, मल्याळी आणि तेलगू या भाषांतील गीतांचा इंग्रजी अनुवाद करून १८७१ साली 'Folk Song of Southern India' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. याच दरम्यान बंगालमध्ये लोकसाहित्यविषयक अतिशय महत्त्वाचा अभ्यास झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये जी. एच. डेमेंट (Bengali Folklore From Dinajpur), तोरू दत्त (Ancient Ballads and Legends of Hindustan), लालबिहारी डे (Folklore of Bengal, Bengal Peasant Life) इत्यादी अभ्यासकांचा नामनिर्देश करता येईल.

मागील काही दशकांचा विचार करता आपल्याला काही महत्त्वाच्या अभ्यासकांचा विचार करावा लागतो. की ज्यांनी लोकसाहित्याची समग्र बाजू लक्षात घेऊन लोकसाहित्याची चिकित्सा केली, लोकसाहित्याभ्यासाला योग्य दिशा दिली, नवीन येणाऱ्या अभ्यासकांना योग्य मार्गदर्शन केले. हे अभ्यासक आपापल्या जागी श्रेष्ठ असून त्यांनी लोकसाहित्याची योग्य चिकित्सा केली आहे. त्यामध्ये बंगालमधील डॉ. दिनेशचंद्र सेन, बिहारमधील रायबहादूर शरच्चंद्र राय, उत्तर प्रदेशातील पं. रामनरेश त्रिपाठी, वासुदेव शरण अग्रवाल, गुजरातमधील झवेरचंद्र मेघाणी, पंजाबमधील देवेंद्र सत्यार्थी इत्यादी अनेक लोकसाहित्याभ्यासकांचा विचार करावा लागेल.

२. ७.महाराष्ट्रीय लोकसाहित्य विचार:

याआधी आपण भारतीय लोकसाहित्याची परंपरा अभ्यासली. ही परंपरा आपल्याला अगदी वेदकाळापासून पाहायला मिळते. महाराष्ट्राच्या किंवा मराठीच्या बाबतीत मात्र एवढ्या मागे जाता येत नाही. कारण वैदिक संस्कृत, पाणिनीय संस्कृत, संस्कृत किंवा पालीसारख्या अतिप्राचीन भाषांपेक्षा मराठी ही नंतरची किंवा आधुनिक म्हणता येते. त्यामुळे मराठी लोकसाहित्याचा विचारही तेवढ्यापुरताच करणे योग्य होईल.

राजवाड्यांनी नारदस्मृतीच्या आधारे जास्तीत जास्त मराठीच्या उत्पत्तीचा काळ हा इ.स. ५०० पर्यंत मागे घेता येईल असे प्रतिपादन केले असले तरी खऱ्या अर्थाने मुकुंदराजांच्या विवेकसिंधूपासून मराठीची सुरुवात झाली असे म्हणता येते. त्यानंतर मात्र भागवत धर्मातील संतांनी आणि महानुभावीय महंतांनी मराठी भाषेला श्रीमंती दिली. ह्या विवेचनाचे कारण असे की, ह्या संत साहित्यामध्ये आणि महानुभावीय साहित्यामध्ये लोकसाहित्याच्या काही खुणा आपल्याला पाहायला मिळतात. प्राचार्य डॉ. दीपा देशपांडे यांसारखे 'महानुभावीय लोकसाहित्य' हा विषय संशोधनासाठी निवडून त्यातून लोकगीते, पदे, भारुडे, स्त्रियांची गाणी, धुवे आणि पोवाडे यांचा धांडोळा घेतात.[१४]हे वाङ्मय बऱ्याच काळापर्यंत मराठी वाचकांपासून दूर होते. कारण ते महानुभावीयांनी सकळ-सुंदरीसारख्या गुप्त लिप्यांमध्ये बंदिस्त केले होते. पण आता ते हळूहळू उजेडात येऊन त्यातून अमौलिक असे वाङ्मयधन मराठी वाचकांना उपलब्ध होत आहे.

यानंतर प्रामुख्याने महाराष्ट्रासंदर्भात विचार करावा लागतो तो एकोणिसाव्या शतकात झालेल्या लोकसाहित्याच्या संकलनाचा. संकलनाचा म्हणण्याचे कारण असे की, या काळात

जो लोकसाहित्याचा अभ्यास झाला तो प्रामुख्याने संकलनाच्या दृष्टीकोनातूनच आणि तोही स्त्रीगीते व लोकगीतांच्याच अंगाने. या काळात अनेकांचा असा समज होता की, स्त्रीगीतांचे किंवा लोकगीतांचे संकलन म्हणजे लोकसाहित्याचे संकलन. याचाच परिणाम म्हणून या काळात लोकसाहित्याच्या इतर प्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले.

मागे उल्लेख केलेल्या मेरी फ्रियर यांनी सन १८५८ साली ‘Old Deccan Days’ या नावाने पुस्तक प्रकाशित केले. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील लोककथांचे संकलन केले गेले आहे. सुरुवातीच्या काळात राजारामशास्त्री भागवत, स. का. छत्रे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, म. मो. कुंटे, का. वा. लेले, ना. गो. चाफेकर इत्यादींनी लोकसाहित्याचे संकलन केल्याचे दिसते. यानंतर प्रामुख्याने विचार करावा लागतो तो वि. का. राजवाड्यांचा. त्यांनी मराठी लोकसाहित्यातील लोकगीत आणि लोककथा ह्या दोन संज्ञा सुचविल्या. यानंतर शं. गो. दाते, द. वा. पोतदार यांनी ही संकलनाची परंपरा चालू ठेवून ती दुर्गा भागवतांपर्यंत पोहोचवली. या मधल्या काळात साने गुरुजींचे ‘स्त्रीजीवन’ हे पुस्तक प्रकाशित झाले. वामनराव चोरघडे आणि काका कालेलकर यांचे ‘साहित्याचे मुलधन’ (१९३८), कमलाबाई देशपांडे यांचे ‘अपौरुषेय वाङ्मय’ (१९४८), अनसूया लिमये यांचे ‘घाटावरील श्रमिकांची गाणी’ (१९५४) ही पुस्तके वगळता या काळातील कार्य लोकसाहित्याच्या संकलनाच्याच स्वरूपाचे आहे. मात्र लोकसाहित्याचा शास्त्रीय दृष्टीकोनातून पहिला प्रयत्न झाला तो दुर्गा भागवतांच्या ‘लोकसाहित्याची रूपरेखा’च्या माध्यमातून. दुर्गा भागवतांनी या ग्रंथात पाश्चात्य लोकसाहित्य, वैदिक काळापासून ते आजपर्यंतचे भारतीय लोकसाहित्य, महाराष्ट्रीय लोकसाहित्य यांच्या संदर्भात सखोल आणि चिकित्सक अभ्यास करून कथा, गाथा, सूत, आख्यायिका, म्हणी, दंतकथा अशा काही संज्ञांची व्युत्पत्तीही सांगण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

याच पठडीतील अभ्यासकांमध्ये डॉ. सरोजिनी बाबर यांचे मराठीतील स्त्रीधन, उखाण्याचे वैभव, स्त्रियांचे खेळ आणि गाणी, जनलोकांचा सामवेद, कुलदैवत, सांगीवांगी इत्यादी अनेक ग्रंथांचे संकलन व संपादन केले आहे. डॉ. रा. चिं. ढेरे हे लोकसंस्कृतीला केंद्रस्थानी ठेवून लोकसाहित्याचा अभ्यास करणारे एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी लोकसंस्कृतीचे उपासक, लोकसंस्कृतीची क्षितिजे, महाराष्ट्राचा देव्हारा, लज्जागौरी, संतसाहित्य आणि लोकसाहित्य: एक अनुबंध, श्रीविठ्ठल एक महासमन्वय, लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा असे अनेक ग्रंथ लिहून लोकसंस्कृतीचा पाया भक्कम केला आहे. डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्याचे अंतःप्रवाह आणि लोकसाहित्याचे स्वरूप हे दोन ग्रंथ लिहून अनेक अभ्यासकांना मार्गदर्शन केले आहे. डॉ. तारा भवाळकर यांनी लोकनागर रंगभूमी, लोकसंचित, लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा असे काही महत्त्वाचे ग्रंथ लिहून लोकसाहित्यात मौलिक भर घातली. नामदेव व्हटकरांनी मराठीचे लोकनाट्य तमाशा: कला व वाङ्मय हा ग्रंथ लिहून तमाशा या प्रयोगरूप कलाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास केला आहे. डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. गंगाधर मोरजे यांनीही अनुक्रमे लोकप्रतिभा आणि लोकतत्त्व, लोकसाहित्य: आकलन आणि आस्वाद हे ग्रंथ लिहून लोकसाहित्याच्या अभ्यासाला वेगळे वळण दिले.

याशिवाय अनेक मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासकांची नावे घेता येण्यासारखी आहेत. त्या सर्वांची नावे येथे घेता येणे शक्य नसले तरी त्या सर्वांची मराठी लोकसाहित्याला लाभलेली साथ वंदनीय अशीच आहे.

२. ८. लोकसाहित्य व लोकसंस्कृती: एक अनुबंध:

लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या आविष्काराचे एक प्रमुख साधन आहे. लोकसाहित्याच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणात लोकसंस्कृतीचे दर्शन होते. किंबहुना लोकसंस्कृतीचा समग्रतेने आभ्यास केल्याशिवाय लोकसाहित्याचा अभ्यासच करता येत नाही. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती हे एकमेकांत इतके संमिश्र असतात की, त्यांना एकमेकांपासून वेगळे करणे शक्य नसते. ते परस्परावलंबी आहेत. काही अभ्यासक लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्यात फारसे अंतर मानत नाहीत. तर काही अभ्यासक लोकसाहित्यासाठी किंवा फोकलोरसाठी 'लोकसंस्कृती' हाच शब्द योग्य असल्याचे प्रतिपादन करतात. कसेही असले तरी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्यातील परस्परसंबंध हे घनिष्ठ स्वरूपाचे असतातहे मान्य करावे लागते. लोकसाहित्याप्रमाणेच लोकसंस्कृतीची व्याख्या करणे कोणालाही शक्य झालेले नाही. लोकसंस्कृती ही समाजपरिवर्तनाबरोबरच आपल्यातही योग्य ते परिवर्तन घडवून आणत असते. लोकसंस्कृतीची पाळेमुळे जशी भूतकाळात रोवलेली असतात तशीच ती वर्तमानातही असतात. हेच आपल्याला लोकसाहित्याच्या बाबतीतही कमी अधिक प्रमाणात सांगता येते. त्यामुळेच लोकसाहित्याची आणि लोकसंस्कृतीची एकच एक व्याख्या आपल्याला दिसत नाही. समाज बदलला की संस्कृती बदलते. संस्कृती बदलली की संस्कृतीची व्याख्या बदलते. ही प्रक्रिया सतत चालू असते. मग मागे झालेली संस्कृतीची व्याख्या आपल्याला अपूर्ण वाटायला लागते. त्यातच ज्या व्याख्या आतापर्यंत झालेल्या आहेत त्या बहुतांशी विवरणात्मक अशाच आहेत. त्यातून वेगवेगळया लक्षणांचे स्पष्टीकरण करण्याचे प्रयत्न झाले आहेत.

लोकसंस्कृतीचे अभ्यासक डॉ. द. ता. भोसले हे संस्कृती आणि लोकसंस्कृती अशा दोन वेगवेगळया संज्ञा वापरतात. ते संस्कृतीला 'महावस्त्रा'ची उपमा देतात. त्यांच्या मते संस्कृती ही एका महावस्त्राप्रमाणे असून व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांना व्यापून असते. त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करते. 'धर्म, अध्यात्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेचे परंपरेने विकसित होत गेलेले प्रतीक म्हणजे संस्कृती होय.'[१५]याहून लोकसंस्कृतीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये भिन्न असतात. आर्यांच्या आगमनाआधी इथे जी एक समृद्ध संस्कृती नांदत होती, तिच्या अधिष्ठानावर लोकसंस्कृती उभी आहे.[१६] येथे द. ता. भोसलेंना संस्कृती म्हणजे आर्यांची संस्कृती असे म्हणावयाचे आहे. जी आज वैदिक संस्कृती म्हणूनही ओळखली जाते. आर्ये हे वेदाला प्रमाण मानणारे म्हणून त्यांची जी संस्कृती ती वैदिक संस्कृती आणि आर्येतर वेद न मानणारे म्हणून त्यांची जी संस्कृती ती लोकसंस्कृती असे मानण्यात येते. याच मताला समर्थन देणारे डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात, लोकसंस्कृती ही नागर संस्कृतीची प्रयोगशाळा आहे. जनपदसंस्कृती आणि ग्रामसंस्कृती ही नावेही तिला स्थूलपणे शोभतील.[१७]

लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. विश्वनाथ शिंदे हे भारतीय संस्कृतीचा विचार करताना म्हणतात, भारतीय संस्कृती ही कोणा एकाची मिरास नाही. ती केवळ निषादांची, द्राविडांची

किंवा आर्यांचीही नाही. ती सर्वसंग्राहक अशी 'हिंदू संस्कृती' आहे. तीमध्ये असंख्य पंथ संप्रदाय आहेत. येथे ईश्वरवादी आहेत, अनीश्वरवादी आहेत. द्वैती-अद्वैती आहेत. वैदिक आहेत, अवैदिक आहेत.[१८] या सर्वांचा समावेश हिंदू संस्कृतीमध्ये होतो. तसेच लोकसंस्कृती व नागर संस्कृती यासंबंधीही त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, नागर संस्कृती आणि लोकसंस्कृती या दोन्ही संस्कृती मुळात भिन्न नाहीत. किंबहुना नागर संस्कृतीची पाळेमुळे ही लोकसंस्कृतीतच गाडलेली असतात. फक्त काळानुरूप त्यात बदल झालेला असतो. लोकसंस्कृती हा लोकसाहित्याच्या अभ्यासाचा महत्त्वाचा घटक आहे. किंबहुना मूळ पाया आहे. लोकगीते, लोककथा, लोकनृत्ये, धार्मिक विधी, सणसोहळे आणि व्रतवैकल्ये समजून घेण्यासाठी आधी लोकसंस्कृती समजून घेतली पाहिजे[१९]असे द. ता. भोसले म्हणतात. पण काही प्रमाणात का होईना हा लोकसाहित्याचा वारसा नागर संस्कृतीतही गोंधळ, यात्रा-जत्रा,गुढी उभारणे, दाराला लिंबू मिरची बांधणे अशा वेगवेगळ्या गोष्टीतून किंवा कृतीतून पाहायला मिळतो.

२. ९.लोकसाहित्याचे प्रयोजन:

१. लोकसाहित्य हे एक असे माध्यम आहे की ते पिढ्यान् पिढ्यांचे लोकसंकेत, लोकसमज, आचार विचार आपल्यात सामावून ठेवत असते. ते पुढच्या पिढ्यांपर्यंत अनेकानेक मार्गाने झिरपत येत असते. ते मृत नसते. म्हणूनच त्यांना जीवनावशेष असेही म्हटले जाते. त्यातून अमौलिक अशा इतिहासाचा उलगडा होऊ शकतो. काही दंतकथा, आख्यायिका ह्या सत्याच्या अधिक जवळ जाणाऱ्या असतात. त्याचप्रमाणे जुने शिल्प, वास्तू, नाणे, भांडी यांना अनुसरून लोकसाहित्याचा अभ्यास केल्यास इतिहासाचा मोठ्या प्रमाणात उलगडा होऊ शकतो. थोडक्यात इतिहासाच्या शोधासाठी लोकसाहित्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो.

२. त्या त्या समाजातील लोकभावना त्या त्या ठिकाणच्या लोकसाहित्यातून प्रकट केल्या जातात. यालाच आपण समाजाविष्कार असेही म्हणू शकतो. हा आविष्कार कोणा एका व्यक्तीचा नसतो, तर त्या समाजातील सगळ्याच घटक व्यक्तींचा असतो. त्याला समाजमान्यता असल्याने ते लोकांमध्ये सारख्याच पातळीवर प्रचलित असते. त्यांची बोली एकच असते, दैनंदिन जीवन जगतांना करावे लागणारे श्रम सारखेच असतात, अडचणी सारख्याच असतात. म्हणजेच ते समपातळीवरचे जीवन जगतात. हे समपातळीवरचे जीवन जगत असल्याने त्यांच्या लोकसाहित्यातून प्रकट होणारा लोकाविष्कार हाही समपातळीवरचाच असतो. ती भावना पूर्वी कोणा एखाद्याचीच असली तरी तिला समाजमान्यता असल्याने ती भावना एकाची राहत नसून आख्या समाजाचीच होते. म्हणून लोकसाहित्याला समाजाविष्काराचे माध्यम म्हणूनही ओळखले जाते.

३. लोकसाहित्याचा वारसा पिढ्यान् पिढ्या जपून ठेवणारे लोक किंवा समाज किंवा विशिष्ट जमाती ह्या प्रामुख्याने अशिक्षित असल्याचे दिसून येते. मागच्या काही दशकांचा विचार केला तर ह्या परिस्थितीत थोडेफार सुधार झाल्याचे दिसून येते. परंतु याला अपवाद म्हणावा इतकेच याचे प्रमाण आहे. अशा अशिक्षित लोकांतही हा लोकसाहित्याचा अमौलिक असा ठेवा पिढ्यान् पिढ्या सुरक्षित राहावा हे एक विशेष आहे. किंबहुना ह्या पिढ्यान् पिढ्या घडून येणाऱ्या संक्रमण क्रियेत औपचारिक शिक्षणाची मुळीच गरज पडत नाही. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला सहज

उत्स्फूर्तपणे दिले जाते. यालाच आपण अनौपचारिकपणे दिले जाते असेही म्हणतो. उदाहरणार्थ बांबूपासून बनविल्या जाणाऱ्या सूप-टोपलीसारख्या वस्तूंचे ज्ञान कोणत्याही शाळा महाविद्यालयामध्ये दिले जात नसून ते घरातील आप्तजनांकडून नवीन पिढीला अनौपचारिकपणेच दिले जाते. म्हणून अनौपचारिक शिक्षणाचे एक महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून लोकसाहित्याकडे पाहिले जाते.

४. समाजात कोणत्या गोष्टी वर्ज आहेत? कोणत्या गोष्टी साध्य आहेत? कोणत्या गोष्टी अश्लील आहेत? कोणत्या गोष्टी श्लील आहेत? कोणत्या गोष्टी कराव्यात? कोणत्या गोष्टी करू नयेत? कोणत्या गोष्टी केल्याने दुष्परिणाम होतील? कोणत्या गोष्टी केल्याने सुपरिणाम होतील? अशा अनेक गोष्टींचे किंवा बाबींचे शिक्षण कळत नकळत लोकसाहित्याच्या माध्यमातून दिले जाते. थोडक्यात संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून लोकसाहित्याकडे पाहिले जाते. यालाच नीतिशिक्षण असेही आपण म्हणू शकतो.

५. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचे नाते किती घनिष्ठ स्वरूपाचे आहेत हे आपण मागेच एकदा पाहिले आहे. आता लोकसाहित्याचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होते हेही पाहिले आहे. हे होत असतांना लोकसाहित्याबरोबरच लोकसंस्कृतीचेही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वहन होते. जसे लोकसाहित्यात काळानुसार बदल घडून येतात तसेच लोकसंस्कृतीतही काळानुसार अनेक बदल घडून येतात. याचाच अर्थ असा की लोकसाहित्यामुळे लोकसंस्कृतीचे सातत्य टिकून राहते. म्हणून लोकसंस्कृतीचे सातत्य टिकवून ठेवण्याचे एक महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून लोकसाहित्याकडे पाहिले जाते.

६. लोकसाहित्याच्या माध्यमातून अनेक सामाजिक संस्थांना कळत नकळत समर्थन मिळत असते. कुटुंबसंस्था, लग्नसंस्था, भाषा इत्यादी सामाजिक संस्थांना लोकसाहित्याचा मोठा आधार असतो. कुटुंबसंस्थेतील नाती-गोती, आचार-विचार, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे एक विशिष्ट स्थान, त्या त्या व्यक्तीलामिळावयाचे आदर आणि अधिकार याचे नीतिशिक्षण लोकसाहित्याच्या माध्यमातून दिले जाते. लग्नसंस्थेतील अनेकानेक विधी टिकून राहण्यासाठी लोकसाहित्य हातभार लावते. तसेच भाषा टिकून राहण्यासाठी लोकसाहित्य महत्त्वाची भूमिका बजावते. उदाहरणार्थ भारतावर तसेच महाराष्ट्रावर आजपर्यंत अनेक परकियांची राज्ये स्थापन झाली आणि त्यांच्या भाषाही त्या त्या काळात भारतीयांवर लादल्या गेल्या असल्या तरी येथील मूळ भाषा या लोकसाहित्याच्या माध्यमातून टिकून राहिली. आजही लोकसाहित्याचे एक महत्त्वाचे अंग असलेल्या बोली ह्या प्रमाण भाषेला लागणाऱ्या शब्दांचा पुरवठा करतात.

७. आज मनोरंजनासाठी अनेक आधुनिक साधनांचा वापर केला जातो. त्यात अजून दिवसेंदिवस नवनवीन साधनांची भर पडतच आहे. असे असले तरी ही सर्व इलेक्ट्रॉनिक साधने आहेत. त्यासाठी विजेची गरज असते. ग्रामीण भागात अजूनही काही ठिकाणी वीज पोहोचलेली नाही. जिथे पोहोचलेली आहे तिथे ती चोवीस तास पोहोचत नाही. परिणामी विजेचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवतो. असे असल्याने मनोरंजनासाठी आधुनिक उपकरणांचा वापर करणे दुरापास्तच. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील लोकांना त्यांचे परंपरेने चालत आलेले पारंपरिक नृत्य, खेळ, गाणी, उखाणे, आहाणे, म्हणी, कोडी इत्यादी लोकसाहित्यातील प्रकार जवळचे वाटतात. त्यांची परंपरेने

चालत आलेली ही साधने जवळजवळ बिनखर्चिक असतात. त्यातून मिळणारा आनंदही नैसर्गिक असतो. म्हणून मनोरंजन हे लोकसाहित्याचे एक महत्त्वाचे प्रयोजन आहे.

२. १०. लोकसाहित्य आणि ललित साहित्यातील साम्यभेद:

१. लोकसाहित्य हे कोणा एका व्यक्तीने निर्माण केलेले नसून ते समाजाविष्कारातून निर्माण झालेले असते. त्याचा कर्ता अनामिक असून समूहमनाचे प्रकटन त्यातून झालेले असते. त्याची मालकी समूहाकडे किंवा समाजाकडे असते. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेले असते. ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे देवाण-घेवाण होत असताना मूळ लोकसाहित्याचे काही भाग गळून पडतात. तर काही भाग नव्याने चिकटवले जातात. ह्या संक्रमणावस्थेत होणारा बदल स्वाभाविक आहे. परंतु नवीन येणाऱ्या पिढीला त्यात बदल घडवून आणल्याचे प्रकर्षाने जाणवतेच असे मात्र नाही. कारण हे बदल एकदमच घडून येत नसून ते पिढी दर पिढी हळूहळू घडत जातात. त्याची बदल घडवून आणण्याची तीव्रता कमी असल्यामुळे ते सहसा नव्या पिढीला जाणवत नाही. याउलट ललित साहित्याचा निर्माता हा कोणीतरी निश्चित असा व्यक्ती असतो. तो सर्वज्ञात असतो. ललित साहित्यकृती एका व्यक्तीने निर्माण केलेली असल्याने त्या साहित्यकृतीवर त्या व्यक्तीची मालकी असते. ललित साहित्यकृतीची आवृत्तीवर आवृत्ती निघून ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असली तरी तिच्यात बदल होण्याचा संभव नसतो.

२. लोकसाहित्याचा प्रसार आणि प्रचार हा लोकसमुहाच्या माध्यमातूनच होत असतो. किंबहुना लोकसाहित्याचा प्रसार आणि प्रचार करण्याचा मूळ उद्देश नसतो, तो आपोआपच लोकाविष्कारातून पिढी दर पिढी होत असतो. याउलट ललित साहित्याचे प्रयत्नपूर्वक प्रसार आणि प्रचार करावे लागते. यासाठी निर्माता आणि प्रकाशक दोघेही आपापल्या पातळीवर वेगवेगळ्या जाहिरातींच्या माध्यमातून प्रयत्न करतात.

३. लोकसाहित्य हे अशिक्षितांतील बोलीभाषेत प्रचलित असते. ते शिकण्यासाठी त्यांना औपचारिक शिक्षणाची गरज नसते. ते अनौपचारिकतेनेच आप्तजनांकडून शिकत असतात. या बोलीला कोणतीही लिपी नसते. परंतु ती व्यावहारिकदृष्ट्या परिपूर्ण असते. म्हणून लोकसाहित्यालाही लिपीची गरज पडत नाही. याउलट ललित साहित्यावर शिक्षित मंडळींचीच मक्तेदारी आहे. अशिक्षित माणसाला त्याचा काहीही उपयोग होत नाही. ललित साहित्याला लिपी असते. ही लिपी शिकण्यासाठी औपचारिक शिक्षणाची गरज असते. त्यासाठी औपचारिकता लागते, प्रमाणभाषा लागते. ह्या प्रमाणभाषेतूनच ललित साहित्याची निर्मिती होते.

४. लोकसाहित्य हे सुरुवातीला व्यक्ती निर्मितच असते. परंतु ते समाजात इतके प्रचलित असते की, पिढी दर पिढी संक्रमणावस्थेत असताना तिच्या कर्त्याचा हळूहळू विसर पडत जातो आणि शेवटी उरते ती फक्त मूळ कलाकृती. तिच्यातही काळानुसार अनेक बदल होत गेल्याने ती व्यक्तीकडून समूहाकडे येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत साहित्य. एकनाथांची भारुडे, नामदेव-तुकारामांसारख्या संतांचे अभंग हे आज समाजात इतके रुळलेले आहेत की, त्यांचा कर्ता नेमका कोण हे सहजा सहजी लक्षात येत नाही. अशा अभंगांना, भारुडांना आज आपण लोकसाहित्याच्या चौकटीत

बंदिस्त करतो. म्हणजे सुरुवातीला लोकसाहित्य हे ललित कलाकृतीच होते हे मान्य करावे लागते. तर काही वेळा ललित साहित्य हे लोकसाहित्यातूनच आपली बीजे उचलत असते. लोकसाहित्याशिवाय ललित साहित्याची निर्मितीच होऊ शकत नाही असाही एक विचार प्रकट केला जातो. ललित वाङ्मयातील फक्त दोन टक्के भाग असा असतो की ज्याची बीजे लोकसाहित्यात नसतात.[२०]

यावरून आपल्याला असे म्हणता येते की, लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांच्यात जसे अनेकानेक भेद आहेत तसेच हे सगळे भेद आपापल्या पोटी पचवून काही ठिकाणी साम्य दर्शवितात. ते एकमेकांपासून प्रेरणा घेतात. तर काहीवेळा मध्यच कुठेतरी आपापले मतभेद दर्शवून स्वतंत्र वाटा चोखाळतात. आणि शेवटी पुन्हा आपापल्या सीमा एकमेकांत विलीन करतात. त्यांचे संबंध घनिष्ठ असून त्यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही.

२. ११. समारोप:

प्रस्तुत प्रकरणात विविध मुद्द्यांच्या आधारे लोकसाहित्याचा विचार केला असला तरी तो सर्वतः परिपूर्ण नाही याची मला जाण आहे. ज्या मुद्द्यांची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे तीही परिपूर्ण आहे असा मी दावा करत नाही. त्यात अनेक गोष्टींची भर घालता येण्यासारखी आहे. याठिकाणी लोकसाहित्य म्हणजे नेमके काय? त्याची उत्पत्ती कशी होते?हे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसाहित्यातील ‘लोक’ आणि ‘साहित्य’ ह्या संज्ञाही येथे स्पष्ट केल्या आहेत. त्याचे समाजाला होणारे वेगवेगळे फायदे येथे विचारात घेतले आहेत. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचे अतूट असलेले संबंध पाहताना विविध अभ्यासकांची मते पडताळून पाहिली आहेत. पाश्चात्य, भारतीय आणि महाराष्ट्रीय लोकसाहित्य परंपरा पाहताना विविध अभ्यासकांचे कार्य, त्यांनी मांडलेले विविध सिद्धांत, त्यांनी स्थापन केलेल्या संस्था, लोकसाहित्याला दिलेली योग्य दिशा, अभ्यासकांना केलेले मार्गदर्शन, यातूनच वेगवेगळ्या संप्रदायांचा उदय, या संप्रदायांना मिळालेला पाठींबा, यातून त्यांचा झालेला विकास आणि अस्त या सर्वांचा येथे उहापोह केला आहे. लोकसाहित्याचे प्रयोजन नेमके कोणते?हे पाहताना लोकसाहित्याच्या आधारे इतिहासाचा उलगडा होऊ शकतो, लोकसंस्कृतीचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी लोकसाहित्याची महत्त्वाची भूमिका असते, अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून लोकसाहित्याकडे पाहिले जाते, लोकसाहित्याच्या माध्यमातून नीतिशिक्षण दिले जाते, लोकसाहित्याच्या माध्यमातून मनोरंजन केले जाते इत्यादी प्रयोजनांचा सविस्तर विचार केला आहे. लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांच्या संदर्भातही अनेक साम्यभेदांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

*****

संदर्भ :

१. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर२०००, पृ. ५

२. तत्रैव, पृ. १

३. ढेरे रा. चिं., लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रकाशनदिन: महाशिवरात्र-१२ मार्च २००२, पृ. १७३

४. भवाळकर तारा, लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा,स्नेहवर्धन प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: १ जुलै २००९,पृ. १९

५. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर २०००, पृ. १०

६. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा-भाग पहिला, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस- पुणे, प्रथमावृत्ती: २६ जानेवारी १९९८, पृ. ४१

७. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर २०००, पृ. १२

८. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा- भाग दुसरा, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस-पुणे, प्रथमावृत्ती: १५ ऑगस्ट २००६, पृ. ४४-४५

९. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर २०००, पृ. १४

१०. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. ४०

११. तत्रैव, पृ. ७०-७७

१२. तत्रैव, पृ. ९२-९३

१३. भवाळकर तारा, लोकसंचित, राजहंस प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: २५ डिसेंबर १९८९, पृ. १ प्रस्तावना

१४. देशपांडे दीपा, महानुभावीय लोकसाहित्य, पृ. १ मनोगत

१५. भोसले द. ता., संस्कृतीच्या पाऊलखुणा, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: २६ मार्च २००१, पृ. ११-१२ मनोगत

१६. तत्रैव,पृ. ११-१५ मनोगत

१७. ढेरे रा. चिं., लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रकाशनदिन: महाशिवरात्र-
१२ मार्च २००२, पृ. १७४

१८. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य: संशोधन आणि समीक्षा, कैलाश पब्लिकेशन्स-औरंगाबाद,
प्रथमावृत्ती: मार्च २०१३, पृ. ४२-४३

१९. भोसले द. ता., लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती:
२७ मे २००४, पृ. ९

२०. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी:
डिसेंबर २०००,पृ. ३२८